**MHAH230007192024**

**नियमीत दिवाणी दावा क्रमांक २९०/२०२४**

**कविता गणेश झेंडे**
**वि.**
**भारती सदाशिव खेडकर व इतर**

**<u>निशाणी क्र.१८ वरील आदेश</u>**

[०१] प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ व २ यांच्याविरुध्द पारित करण्यात आलेला विना कैफियतचा आदेश रद्द करुन त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्याच्या विनंतीसह सादर केलेला आहे.

[०२] वादीच्या विद्वान वकिलांनी अर्जाच्या पाठीमागील पानावर म्हणणे सादर करुन अर्जास तीव्र हरकत घेतली.

[०३] अर्जाचे, त्यावरील म्हणण्याचे आणि अभिलेखाचे अवलोकन केले.

[०४] दोन्ही बाजुच्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

[०५] प्रस्तुतचा दावा हा जाहिर ठराव व निरंतर ताकीद मनाई हुकूम मिळणेबाबत दाखल केलेला आहे. म्हणजेच प्रस्तुतच्या दाव्यात दोन्ही पक्षकारांचे स्थावर मिळकतीसंदर्भात हक्क व अधिकारांचा विषय आहे. यात काही एक शंका नाही की, प्रतिवादी क्र. १ व २ यांना कैफियत सादर करण्यास उशीर झालेला असुन दिनांक १२-०८-२०२५ रोजीच्या निशाणी क्र.१ वरील आदेशान्वये मुळ दावा हा त्यांच्याविरुध्द विना कैफियत चालविण्याचा आदेश पारीत करण्यात आलेला आहे. मात्र आज रोजी पावेतो प्रस्तुतच्या दाव्याची सुनावणी सुरु झालेली नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र. १ व २ यांच्याविरुध्द पारित झालेला विनाकैफियतचा आदेश रद्द करुन त्यांची कैफियत अभिलेखावर घेणे न्यायोचित होईल. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी कैफियत दाखल करण्यास केलेला उशीर त्यांच्यावर योग्य तो खर्च लादुन माफ करता येईल. एकुणच वर नमुद कारणांचा विचार करता, खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

**(१)** प्रस्तुत अर्ज रक्कम रुपये २००/- च्या खर्चावर मंजुर करण्यात येत आहे.

**(२)** प्रतिवादी क्र.१ व २ यांना कैफियत दाखल करण्यासाठी झालेला विलंब व त्यांच्याविरुध्द पारित करण्यात आलेला विनाकैफियतीचा आदेश रद्द करण्यात येत असुन त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात येत आहे.

**(३)** प्रतिवादी क्र. १ व २ यांनी पुढील तारखेपावेतो खर्चाची रक्कम रुपये २००/- वादींना देण्यात यावी.

**(४)** प्रस्तुतच्या अर्जाचा खर्च प्रतिवादी क्र. १ व २ यांनी सोसावा.

PATIL PRAVIN VISHWAS

Digitally signed by PATIL PRAVIN VISHWAS
Date: 2025.11.14 18:06:40 +0530

श्रीगोंदा.
दिनांक:- १४-११-२०२५

(प्रविण वि. पाटील)
सह दिवाणी न्यायाधीश,
कनिष्ठ स्तर, श्रीगोंदा.

## :-CERTIFICATE-:

I affirm that, the contents of this pdf file order are same, word for word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Case No. | :- | RCS 290/2024 |
| Name of Stenographer | :- | Smt. N. D. Dawat |
| Court Name | :- | Jt. Civil Judge,<br>J.D.& J.M.F.C, Shrigonda. |
| Date of Decision | :- | 14-11-2025 |
| Order signed by P. O. on | :- | 14-11-2025 |
| Order uploaded on | :- | 14-11-2025 |